**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म.**/ /
दि. 01/06/2026

*प्रेसनोट*

*मा. उपसंचालक, आरोग्य सेवा परीमंडळ, ठाणे यांची भेट*

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, राष्ट्रीय आयुष अभियान, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम, आयुष्मान भारत डिजिटल मिशन, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान तसेच राष्ट्रीय व राज्य आरोग्य कार्यक्रमांतर्गत कार्यान्वित आरोग्य संस्थांमार्फत राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना गुणवत्तापूरण व परिणामकारक आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. राष्ट्रीय व राज्य आरोग्य कार्यक्रम व योजनांची प्रभावी आणि व्यापक स्वरूपात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी समन्वय अधिकारी म्हणून डॉ. अशोक नांदापुरकर, उपसंचालक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मा. डॉ. अशोक नांदापुरकर, उपसंचालक, आरोग्य सेवा परीमंडळ, ठाणे यांनी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर डी.एम. पेटिट रुग्णालय, वसई येथे भेट देऊन रुग्णालयाची पाहणी केली. तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, वसई व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, दिवाणमान येथे भेट देऊन पाहणी करून त्यामध्ये PMJAY, ABHA Card, OPD Services, HLL Lab, Pharmacy, Inj. HPV Vaccination Campaign, NCD Programme, टी.बी मुक्त भारत अभियान व इतर राष्ट्रीय कार्यक्रमाचा आढावा घेऊन त्याबददल योग्य त्या सूचना देण्यात आल्या.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आयुष्मान आरोग्य मंदीर, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी, जी.एन.एम, ए.एन.एम, आशा स्वयंसेविका यांची १३ आरोग्य सेवाबाबत माहिती व आढावा घेण्यात आला. तसेच आरोग्य केंद्रामध्ये देण्यात येणाऱ्या सुविधांचा व विविध राष्ट्रीय कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. अधिकारी / कर्मचारी यांच्या बरोबर संवाद करुन पोर्टलमध्ये येणाऱ्या अडचणी बाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर त्यांनी वैद्यकीय आरोग्य विभाग, मुख्यालय, विरार (प.) येथील कामकाजाचा आढावा घेतला. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाचे कामकाज समाधानकारक असल्याचे नमूद करून, सेवांमध्ये अधिक सुधारणा करण्याबाबत मार्गदर्शन केले.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका